**तात्काळ/कालमर्यादा/महत्त्वाचे**

क्र.पोमसं/३१/३९-४/मोवाअ-संगणक अग्रीम (२०२२-२३)/२०२/२०२२, मुंबई, दि.२४/०३/२०२३

**विषय -** **लेखा अनुदान २०२२-२३**
मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष- " ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०४, संगणक अग्रिमाबाबत.

********

**आदेश**

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.बीयुडी - ०६२२/प्र.क्र.१११/आस्था-१, दि.०३/०३/२०२३ अन्वये सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता रु. **५८,००,०००/-** (अक्षरी रु. अठ्ठावन्न लाख फक्त) एवढा निधी शासनाने चिन्हांकित करुन दिलेला आहे. या कार्यालयाच्या अधिपत्याखालील घटक कार्यालयांना त्यांच्या अधिनस्थ १५ अधिकारी/कर्मचाऱ्यांना संगणक अग्रिमाकरीता एकूण रु.३,००,०००/- (अक्षरी रु.तीन लाख फक्त) इतका निधी **संबंधित विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांचे आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांना संगणक अग्रिम वाटप करण्याकरिता बी.डी.एस. प्रणालीवर सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

२. सदर शासन निर्णयानुसार शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या रु. **५८,००,०००/-** (अक्षरी रु. अठ्ठावन्न लाख फक्त) एवढ्या निधी पैकी रु.३,००,०००/- (अक्षरी रु.तीन लाख फक्त) इतक्या निधीचे सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांना, शासन निर्णय वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०११/ प्र.क्र.५०/ २०११/ विनियम, दि.०३/०२/२०१२ अन्वये अग्रीमाची रक्कम जास्तीत जास्त रु.२०,०००/- (रुपये वीस हजार फक्त) किंवा संगणक/ लॅपटॉप/टॅबलेट संगणकाची प्रत्यक्ष किंमत, यापैकी जी कमी असेल त्या रकमेचे संगणक अग्रिमाकरिता वाटप करावे.

३. विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, दिनांक १७/४/२०१५ अन्वये मुंबई वित्तिय नियम १९५९ मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या, तसेच वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १३ नियम १३६,१३७ व १३९ अन्वये संगणक अग्रिम मंजूरीचे आदेश निर्गमित करावेत. त्यामध्ये शासन निर्णय वित्त विभाग क्र.अग्रिम-१०११/प्र.क्र. ५०/२०११/ विनियम, दि. ०३/०२/२०१२ मधील विहित अटी / शर्तींचा समावेश करावा.

४. **विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना सूचित करण्यात येते की, शासन वित्त विभाग, क्र. अग्रिम-१०११/प्र.क्र.५०/ २०११/विनियम, दि. ०३/०२/२०१२ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर शासन निर्णयातील अट क्र. ९ मधील विहित तरतुदीनुसार संगणक खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे संगणक अग्रिम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत संबंधीत कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपूर्ण रक्कम १७.७५% व्याजदराने एक रकमी वसूल करण्यात येईल, असे मंजूरी आदेशात नमुद करावे. अग्रिम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील नियम १२४(बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम-१०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि.२६/०९/१९९७ मध्ये नमूद तसेच, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.**

५. शासनाने, सदर शासन निर्णयान्वये चिन्हांकित करुन दिलेल्या निधीचा विनियोग दि.३१/०३/२०२३ पर्यंत होणे आवश्यक आहे. सर्व घटक प्रमुखांना निर्देशित करण्यात येते की, देयके दि.३१/०३/२०२३ पूर्वी कोषागारात सादर करण्यात यावीत.

६. सदर निधीचा विनियोग पुर्णत:न केल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात. तरी निर्देश देण्यात येत आहेत की, विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचे संगणक अग्रिम मंजूरी संबंधीचे आदेश त्वरीत निर्गमित करावेत. तसेच, आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके कोणत्याही परिस्थितीत दि.३१/०३/२०२३ पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत

अधिकारी/ कर्मचाऱ्याला अग्रिम रक्कम अदा करणे ही सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन व या प्रकरणी वैयक्तीकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखा विषयक कामकाज हाताळणारे लेखा अधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी /लिपिक वर्गीय अधिकारी /कर्मचारी यांनी स्वत: लक्ष देऊन त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. जेणेकरुन शासनाने चिन्हाकिंत करुन दिलेल्या निधीचा विनियोग पूर्णत: होईल. तसेच शासन वित्त विभाग, क्र. अग्रिम-१०११/ प्र.क्र.५०/ २०११ /विनियम, दि. ०३/०२/२०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या अटींचे पालन करुन त्यानुसार संबंधितांना अग्रिमाचे वाटप करण्याची दक्षता घ्यावी. संबंधीतांना अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्याची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक त्यांचे सेवापुस्तकात/ सेवापटात नोंद करावा आणि या कार्यालयास /शासनास व महालेखापाल-१,मुंबई /महालेखापाल-२, नागपूर/अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना दि.१०/०४/२०२३ पुर्वी न चुकता तसा अहवाल सादर करावा.

७. असे निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी/महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण-१४ नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. व त्यानुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळाची प्रमाणित माहिती दि.१०/०४/२०२३ पूर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

८. तसेच खर्चमेळ्याची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारीही क्षेत्रीय विभागीय कार्यालय प्रमुखांची राहील व त्याप्रमाणे माहिती न पाठविणाऱ्या कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल, यांची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/कार्यालय प्रमुखाची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

९. सदरचा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०-शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०४- संगणक अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०१८५१) अन्वये खर्ची टाकण्यात यावा व वित्तीय वर्ष २०२२-२३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे किंवा नाही, याची खातरजमा न विसरता करावी याचीही कृपया नोंद घ्यावी.

(अनुप कुमार सिंह)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई

प्रति,
पोलीस आयुक्त, अमरावती शहर.
पोलीस अधीक्षक, जळगांव / वाशिम

प्रत सविनय सादर -
अपर मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, गृह विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,
मादामकामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२
(लक्षवेध:- कक्ष अधिकारी, आस्था - १)
महालेखापाल - २, नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

| पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई "७६१०- शासकीय कर्मचारी इ. ना कर्जे "<br>वित्तीय वर्ष २०२२-२३ मागणी क्र.बी-११ गौणशिर्ष २०४- वैयक्तिक संगणक अग्रिम | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | घटक कार्यालयाचे नाव | विभाग प्रमुख | अर्जांची संख्या | मागणी केलेले अनुदान |
| १. | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | १ | २०००० |
| २. | पोलीस अधीक्षक, जळगांव | पोलीस अधीक्षक, जळगांव | ११ | २२०००० |
| ३. | पोलीस अधीक्षक, वाशिम | पोलीस अधीक्षक, वाशिम | ३ | ६०००० |
| | | एकूण | १५ | ३,००,०००/- |